जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती
कॅम्प अमरावती ४४४ ६०२
(गृह विभाग)
☎: ०७२१-२६६२०२५/२६६२४१३ फॅक्स : ०७२१-२६६२८४३
Email:- homebranch.collamt@gmail.com Website :- www.amravati.nic.in

क्र. कक्ष-२७/कलि/गृह विभाग/कावि-७९२/२०२१ दिनांक ३१ /०५/२०२१

वाचा :-
१. आपत्ती व्यवस्थापन कायदा-२००५
२. साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७
३. या कार्यालयाकडील आदेश जा.क्र.कक्ष-२७/कलि/गृह विभाग/कावि-७५३/२०२१ दि. २२/०५/२०२१
४. या कार्यालयाकडील आदेश जा.क्र.कक्ष-२७/कलि/गृह विभाग/कावि-७५३/२०२१ दि. २२/०५/२०२१
५. या कार्यालयाकडील आदेश जा.क्र.कक्ष-२७/कलि/गृह विभाग/कावि-७३१/२०२१ दि. १९/०५/२०२१
६. मा. मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुर्नवसन विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील सूचना पत्र (Break The Chain) क्रमांक:DMU/२०२०/CR.९२/DisM-१ दिनांक ३०/०५/२०२१
७. या कार्यालयाकडील आदेश क्र.कक्ष-२४/नियंत्रण कक्ष/जिआव्यअ/सो डि आदेश/कार्य/पथक/कावि-११२२/२०२१ दि. ०७/०५/२०२१

## आदेश

**(संचारबंदी आदेश दिनांक ०१/०६/२०२१ ते पुढील आदेशापर्यंत)**

ज्या अर्थी कोविड-१९ विषाणूच्या संसर्गाचा प्रार्दुभाव झपाट्याने वाढत असल्याने आपात्कालीन उपाययोजनेचा भाग म्हणून लॉकडाऊन (Break The Chain) अंतर्गत संदर्भिय क्र. ४ अन्वये संपूर्ण अमरावती जिल्हयाकरीता दिनांक २३/०५/२०२१ चे ००.०० वा. पासून ते ०१/०६/२०२१ रोजी सकाळी ७.०० वा. पर्यंतचे संचारबंदी आदेश पारीत करण्यात आले आहे.

तथापी याबाबत कोविड-१९ च्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासन यांचेकडील संदर्भिय क्र. ६ अन्वये प्राप्त झालेल्या सूचनापत्रानुसार व फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (१) (२) (३) अन्वये दिनांक ०१/०६/२०२१ चे सकाळी ७.०० पासुन पुढील आदेशापर्यंत खालीलप्रमाणे संचारबंदी व प्रतिबंधात्मक आदेश पारीत करीत आहे..

१. सर्व प्रकारची जिवनावश्यक व अत्यावश्यक सेवाअंतर्गत असलेली किराणा दुकाने, भाजीपाला दुकाने, फळ विक्रेते, डेअरी, बेकरी, मिठाई, खाद्य पेय विक्रेता यांची दुकाने, पिठाची गिरणी इ. व सर्व प्रकारांची खाद्य पदार्थ विक्रीची दुकाने (कोंबडी, मटन, पोल्ट्री मासे व अंडी यासह) दुग्ध विक्री केंद्रे, दुग्धालय, डेअरी, दुध संकलन केंद्र, दुध वितरण व्यवस्था हवा उपरोक्त नमुद केलेल्या सर्व सुविधा सकाळी ७.०० ते दुपारी २.०० या कालावधीत नियमित सुरु ठेवण्यास परवानगी राहील.

२. सर्व प्रकारची बिगर जिवनावश्यक सेवाअंतर्गत असलेली दुकाने/प्रतिष्ठाने ही सकाळी ७.०० ते दुपारी २.०० पर्यंत (सोमवार ते शुक्रवार) सुरु राहतील. **आठवडाअखेर शनिवार व रविवार सर्व बिगर जिवनावश्यक दुकाने बंद राहतील.** यामध्ये जी दुकाने शॉपींग सेंटर/मॉल च्या आत आहेत अशा दुकानांना परवानगी राहणार नाही एकल स्वरुपाची व स्वतंत्र असलेल्या दुकानांना परवानगी अनुज्ञेय राहील. जिवनावश्यक व बिगर जिवनावश्यक दुकानाअंतर्गत ई कॉमर्स व्दारे घरपोच सेवा सुरु ठेवण्यास परवानगी अनुज्ञेय राहील.

३. सर्व प्रकारची मद्यागृहे, मद्यदुकाने व बार ही दुकाने ही दररोज सकाळी ७.०० ते दुपारी २.०० या कालावधीत घरपोच सेवेकरीता सुध्दा सुरु ठेवण्यास परवानगी देण्यात येत आहे.

४. हॉटेल, रेस्टॉरंट,खानावळ, शिवभोजन थाळी यांची घरपोच पार्सल सेवा सकाळी ११.०० ते सायंकाळी ७.०० वाजेपर्यंत सुरु राहील. कोणत्याही परिस्थितीत ग्राहकास हॉटेल, रेस्टॉरंट, खानावळ, शिवभोजन थाळी येथे स्वत जावुन पार्सल घेता येणार नाही. सदर ठिकाणी ग्राहक आढळुन आल्यास संबधीत आस्थापनेवर कायदेशिर कारवाई केली जाईल. याबाबतीत पर्यवेक्षणाची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्था/स्थानिक पोलीस स्टेशन व जिल्हा पुरवठा अधिकारी यांची राहील.

५. सर्व प्रकारची शासकीय रास्त भाव दुकाने ही सकाळी ७.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यंत वितरणाकरीता सुरु ठेवण्यात यावीत. संबंधित तहसिलदार तसेच शासकीय रास्त भाव दुकानदार यांनी त्यांचे दुकानांचे लाभार्थी यांचा व्हॉटसअॅप ग्रुप तयार करावा व धान्य वितरणाकरीता टोकन सिस्टम चा वापर करावा.

६. नागरिकांना दुपारी ३.०० वाजता नंतर वैद्यकीय कारण व इतर आवश्यक कारणाशिवाय व अनुज्ञेय सेवा व्यतिरिक्त इतर कारणांकरीता हालचाल करण्यास सक्त मनाई राहील. याचा भंग केल्याचे आढळून आल्यास सदरचे वाहन जप्त करण्याची व दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल

७. उक्त कालावधीत जिल्हयातील सर्व कृषी उत्पन्न बाजार समित्या, फळ बाजार धान्य खरेदी, कृषी सेवा केंद्रे ही संदर्भिय क्र. ५ अन्वये पारीत केलेल्या आदेशानुसार सुरु राहतील.

८. संदर्भिय क्र. ५ च्या आदेशामध्ये अंशत: बदल करण्यात येऊन यापुढे कृषी सेवा केंद्रे ही दररोज विक्री करीता सकाळी ७.०० ते दुपारी ३.०० या कालावधीत नमुद केलेल्या सूचना व आदेशानुसार नियमितपणे सुरु राहतील.

९. अत्यावश्यक सेवेतील सद्यस्थितीत सुरु असलेली सर्व प्रकारची शासकीय कार्यालये (उदा. महसूल विभाग, ग्रामपंचायत, आरोग्य सेवा, महानगरपालीका, पाणी पुरवठा विभाग, महावितरण, महापारेषण, कोषागार कार्यालये इ.) वगळता इतर शासकीय कार्यालये, निमशासकीय कार्यालये, महामंडळे ही त्यांचे आवश्यकतेप्रमाणे २५% कर्मचारी यांचे उपस्थितीसह कामकाजाकरीता सुरु ठेवता येईल. याबाबतचे नियोजन संबंधित कार्यालयाचे कार्यालय प्रमुख यांनी त्यांचे स्तरावरुन करावे. २५% पेक्षा जास्त कर्मचारी यांचे उपस्थितीसह कार्यालय सुरु ठेवावयाचे असल्यास त्या अनुषंगाने कार्यालय प्रमुख यांनी या कार्यालयाकडून तशी परवानगी घ्यावी. अभ्यांगतांचा प्रवेश मर्यादीत ठेऊन अंतर्गत कामकाजाकरीता कार्यालय उपरोक्त नमुद केलेल्या उपस्थितीसह सुरु ठेवण्यात यावे.

१०. अमरावती जिल्हयाच्या सर्व सिमावर्ती ठिकाणी पोलीस अधिक्षक (ग्रामीण) अमरावती यांनी नाकेबंदी करुन प्रवेश करण्याकरीता RT-PCR किंवा Rapid Antigen Test चा रिपोर्ट निगेटिव्ह असल्याशिवाय प्रवेश देण्यात येऊ नये त्यानुसार प्रतिबंध करावा. अमरावती जिल्हयामध्ये प्रवेश करणारी वाहने ही जिल्हयाच्या सिमेवर रोखून त्यांची नाकेबंदी करावी व त्यांना जिल्हयात येण्यापासून प्रतिबंध करण्यात यावा. यामध्ये कुणाच्या नातेवाईकाचा मृत्य झाल्यास अंत्यसंस्काराकरीता जाणाऱ्या वाहनांना, वैद्यकीय, जिवनावश्यक व आपात्कालीन परिस्थिती, कोविड-१९ च्या अत्यावश्यक कारणांकरीता वाहतूक करणाऱ्या वाहनांना परवानगी देऊन प्रवेश करण्याकरीता मनाई करण्यात येऊ नये.

११. मालवाहतूक करणाऱ्या वाहनांना वाहतुकीकरीता कोणत्याही प्रकारचे निर्बंध असणार नाही व ही वाहतूक पूर्ण वेळ सुरु राहील. अत्यावश्यक व जिवनावश्यक वस्तु व सेवांची मालवाहतूक करणाऱ्या सर्व वाहनांना साठा पुर्नभरण व वितरण करण्याकरीता निर्गमित केलेल्या वेळाव्यतिरिक्त इतर वेळेतही परवानगी अनुज्ञेय राहील.

**१२. संचारबंदीच्या कालावधीत नागरिकांनी अत्यावश्यक कामाशिवाय तसेच गरज असल्याशिवाय घराबाहेर पडू नये. ग्राहकांनी दुकानामध्ये खरेदी करण्याकरीता जातेवेळी पायी चालावे अथवा सायकलीचा वापर करावा. याकरीता जवळपास असलेल्या बाजारपेठ, अतिपरिचित दुकानदार यांचा वापर करावा. शक्यतो दुरचा प्रवास करुन खरेदी करणे टाळावे. अत्यावश्यक कारणाशिवाय व Rapid Antigen Test रिपोर्ट निगेटिव्ह असल्याशिवाय जिल्हयाअंतर्गत प्रवास करु नये. खरेदी करण्याकरीता घरपोच सेवा, ई-कॉमर्स, ऑनलाईन सिस्टम चा वापर करावा.**

**१३. संचारबंदी निर्देशानंतरही अनावश्यकरित्या व विनाकारणा फिरणाऱ्या व्यक्ती आढळून आल्यास त्यांची RAT (Rapid Antigen Test) करुन त्यानुसार दंडात्मक व फौजदारी कार्यवाही करण्यात यावी. याबाबतचे नियोजन स्थानिक स्वराज्य संस्था यांनी त्यांचे स्तरावरुन करावे.**

**१४. सर्व प्रकारच्या व्यापारी संघटना, ट्रेडर्स असोसिएशन , नागरिक यांनी थेट खरेदी न करता जास्तीत जास्त घरपोच सुविधेचा वापर करण्याबाबत भर द्यावा.**

**सदर कालावधीमध्ये निर्बंधासह सुट देण्यात आलेल्या सेवाबाबतचे विवरणपत्र खालीलप्रमाणे**

| अ.क्र. | सेवा तपशील | निश्चित करण्यात आलेली वेळ |
|---|---|---|
| १. | सर्व प्रकारची जिवनावश्यक व अत्यावश्यक असलेली किराणा दुकाने, भाजीपाला दुकाने, फळ विक्रेते, डेअरी, बेकरी, मिठाई, खाद्य पेय विक्रेता यांची दुकाने, पिठाची गिरणी, इ. व सर्व प्रकाराची खाद्य पदार्थ विक्रीची दुकाने (कोंबडी, मटन, पोल्ट्री मासे व अंडी यासह) दुग्ध विक्री केंद्रे, दुग्धालय, डेअरी, दुध संकलन केंद्र, दुध वितरण व्यवस्था, पाळीव प्राणी यांची खाद्यपदार्थ विक्री दुकाने (नियमित सुरु) | सकाळी ७.०० ते दुपारी २.०० पर्यंत |
| २. | सर्व प्रकारची बिगर जिवनावश्यक सेवाअंतर्गत असलेली दुकाने/प्रतिष्ठाने (नियमित सुरु) (शनिवार व रविवार बंद) | सकाळी ७.०० ते दुपारी २.०० वाजेपर्यंत |
| ३. | सर्व प्रकारची मद्यागृहे, मद्यदुकाने व बार ही दुकाने, (घरपोच सेवा) | सकाळी ७.०० ते दुपारी २.०० वाजेपर्यंत |
| ४. | हॉटेल, रेस्टॉरंट,खानावळ, शिवभोजन थाळी(घरपोच सेवा) | सकाळी ११.०० ते सायंकाळी ७.०० पर्यंत |
| ५. | सर्व प्रकारची शासकीय रास्त भाव दुकाने कृषी सेवा केंद्रे, कृषी निविष्ठांची | सकाळी ७.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यंत |

| | | |
|---|---|---|
| | दुकाने, कृषी प्रक्रिया उद्योगगृहे, शेती अवजारे आणि शेतातील उत्पादनांशी संबंधित दुकाने, पावसाळी दुकाने, (नियमित सुरु) | |
| ६. | सर्व राष्ट्रीयकृत बँका, सहकारी बँका, खाजगी बँका, बिगर बँकींग वित्तीय संस्था/सेवा, सहकारी संस्था, पतपेढी संस्था, पोस्ट ऑफीसेस, विमा कार्यालये, सूक्ष्म वित्तीय संस्था व इतर सर्व प्रकारच्या वित्तीय संस्था | त्यांना विहित करण्यात आलेल्या वेळानुसार |

सार्वजनिक, खाजगी क्रिडांगणे, मंगल कार्यालये, बगिचे सर्व चित्रपट गृहे, व्यायमशाळा, जलतरण तलाव, करमणूक व्यवसाय नाटयगृह, कलाकेंद, प्रेक्षकगृहे, सभागृहे ही पूर्णत: बंद राहतील. सर्व खाजगी व सार्वजनीक वैद्यकीय सेवा, पशुचिकीत्सा सेवा, त्यांचे नियमीत वेळेनुसार सुरु राहतील सर्व मेडीकल स्टोअर्स, औषधी दुकाने, औषधालये व दवाखाने तसेच ऑनलाईन औषध सेवा २४ तास या कालावधीत सुरु राहतील.

सदर आदेशाचा भंग करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने भारतीय दंड संहिता- १८६० च्या कलम १८८ अन्वये शिक्षापात्र असलेला अपराध केला आहे असे मानण्यात येईल व संबंधितावर सदर कलमानुसार कारवाई करण्यात येईल अशा व्यक्ती, संस्था, संघटना यांचेवर गुन्हे दाखल करण्यासाठी संबंधित पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक दर्जापेक्षा कमी नाही अशा अधिकाऱ्यास या आदेशाव्दारे पुढील आदेशापर्यंत प्राधिकृत करण्यात येत आहे.

तसेच संदर्भिय क्र. ७ अन्वये कोरोना विषाणूचा प्रार्दुभाव रोखण्याकरीता प्रतिबंधात्मक उपाययोजना अंतर्गत स्वच्छता व सार्वजनिक शिस्तीचे पालन न करणाऱ्या व्यक्तींवर दंडात्मक कार्यवाही करण्याबाबतचे आदेश पारीत करण्यात आले आहे. त्यानुसार

| अनु. क्र. | गुन्हयाचे स्वरुप | प्रथम आढळल्यास करावयाची कार्यवाही | दुसऱ्यांदा आढळल्यास करावयाची कार्यवाही | कार्यवाही करणारा विभाग | कार्यवाही कोणावर |
|---|---|---|---|---|---|
| १. | सार्वजनिक स्थळी चेहऱ्यावर मास्क न वापरणे | रु. ७५०/- | फौजदारी कार्यवाही करणे | स्थानिक स्वराज्य संस्था (म.न.पा., न.पा.,नपं, ग्रा.पं.) | संबंधित व्यक्तींवर |
| २. | सामाजिक अंतर(Socail Distancing) न राखल्यास | रु. ३५,०००/- | फौजदारी कार्यवाही करणे | स्थानिक स्वराज्य संस्था (म.न.पा., न.पा.,नपं, ग्रा.पं.) | दुकाने/प्रतिष्ठाने आस्थापना |
| ३. | मंगल कार्यालयामध्ये लग्नसमारंभ आयोजित केल्यास. | रु. ५०,०००/- | फौजदारी कार्यवाही तसेच पुढील ४ महिन्यांकरीता संबंधित लॉन/हॉल/मंगल कार्यालय सीलबंद करणे | स्थानिक स्वराज्य संस्था (म.न.पा., न.पा.,नपं, ग्रा.पं.) | संबंधित लॉन/हॉल/ मंगल कार्यालय व्यवस्थापक/ चालक/मालक |

उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे दंडात्मक कारवाई करावी. सदरची कारवाई ही संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था यांनी करावी. या व्यतिरिक्त संदर्भिय क्र. ७ च्या आदेशान्वये नमुद करण्यात आलेल्या इतर दंडात्मक कारवाई हया जैसे थे लागू राहतील.

उपरोक्त दिलेल्या निर्देशाव्यतिरिक्त संदर्भिय क्र. ४ च्या आदेशामधील इतर सर्व सूचना व आदेश हे जैसे थे लागू राहतील. सदरचे आदेश हे दिनांक ०१/०६/२०२१ चे सकाळी ७.०० वाजतापासून पुढील आदेशापर्यंत संपूर्ण अमरावती शहर व जिल्हयातील शहरी व ग्रामीण भागाकरीता लागू राहतील. या आदेशाबाबत दर शनिवारी आढावा बैठक घेण्यात येईल आणि जर कोविड रुग्णसंख्येचा *Positivity Rate* वाढल्याचे आढळून आल्यास या आदेशान्वये देण्यात आलेल्या सुट परत घेण्याबाबत तसेच शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल. सर्व नागरिक/आस्थापना यांनी कोरोना संक्रमण साखळी तोडण्याकरीता आपआपल्या स्तरावरुन त्रिसुत्री पध्दतीची अंमलबजावणी करावी.

या आदेशाची मोठया प्रमाणात जनजागृती करावी व स्थानिक प्रशासन, पोलीस विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था यांनी प्रसिध्दी देऊन कार्यवाही करावी.

Shail. 31/5

(शैलेश नवाल)
**जिल्हादंडाधिकारी अमरावती**

**प्रतिलिपी:-**

१. मा. विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांना माहितीकरीता सविनय सादर.
२. मा. पोलीस आयुक्त (शहर) यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.
३. पोलीस अधिक्षक (ग्रामीण) अमरावती यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.
४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.
५. आयुक्त, महानगरपालीका अमरावती यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.
६. मुख्य वनसंरक्षक, वन विभाग अमरावती यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.
७. कुलसचिव, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांना माहिती व कार्यवाहीकरीता.
८. प्रादेशिक परिवहन अधिकारी, अमरावती यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.
९. अधिक्षक, राष्ट्रीय महामार्ग पोलीस, अमरावती यांना माहिती व कार्यवाहीकरीता.
१०. पोलीस वाहतूक शाखा (शहर/ग्रामीण) अमरावती यांना माहिती व कार्यवाहीकरीता
११. उपविभागीय दंडाधिकारी ------------------------(सर्व) यांना माहिती व उचित कार्यवाहीस.
१२. तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी ------------------------(सर्व) यांना माहिती व उचित कार्यवाहीस
१३. मुख्याधिकारी नगर परिषद/पंचायत ------------------------(सर्व) यांना माहिती व उचित कार्यवाहीस
१४. जिल्हा माहिती अधिकारी अमरावती- **सदर आदेशास अमरावती जिल्ह्यामधील स्थानिक वृत्तपत्रातून प्रसिध्दी देण्यात यावी.**
१५. अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क विभाग, अमरावती यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता.
१६. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) अमरावती यांना माहिती व कार्यवाहीकरीता
१७. विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, अमरावती यांना माहिती व कार्यवाहीकरीता.
१८. सहा. आयुक्त (कामगार/अन्न व औषधी प्रशासन/समाज कल्याण विभाग) यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.

**जिल्हादंडाधिकारी अमरावती**